पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०१/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०१/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
६. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.डोईफोडे – सहाय्यक आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) निविदा नोटीस क्र.६३/२-२०१६-१७ च्या कामाच्या स्वरुपात व ठिकाणात बदल करणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील जिजाऊ सांस्कृतिक भवनात स्थापत्य विषयक कामाच्या जागेत बदल करणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.३ चिखली येथील मोरेवस्ती येथील नव्याने समाविष्ट झालेल्या संतकृपा हौसिंग सोसा. सिंहगड हौसिंग सोसा., एकता हौसिंग सोसा.येथील रस्ते डांबरीकरण करणेबाबत – मा.स्वाती काटे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.३ चिखली येथील १/९८ टाऊन हॉल विकसित करणेबाबत - मा.स्वाती काटे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) फुगेवाडी येथे मुंबई-पुणे रस्त्यालगत नाला बांधणेच्या कामाऐवजी फुगेवाडी, कासारवाडी येथे गटर्स करणे, कॉंक्रीट पेव्हींग करणे, व इतर किरकोळ दुरुस्तीची कामे करणेबाबत - – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) नवी सांगवी वॉर्ड ५८ येथील स्वच्छतागृहांचे नुतनीकरण करणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) वॉर्ड क्र.५७ कवडेनगर येथील नाल्यामधील जलनि:सारण लाईनची सुधारणा विषयक कामे करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३१ मध्ये ठिकठिकाणी करणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) सांगवी प्रभाग क्र.६० मधील प्रियदर्शनीनगर, एस.टी.कॉलनीमध्ये ड्रेनेज चेंबर आर.सी.सी. करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३२ मध्ये ठिकठिकाणी करणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) वाकड ते हिंजवडी मनपा हद्दीपर्यंत बीआरटीएस रस्ता विकसित करणे या कामामधून इतर ठिकाणच्या बी.आर.टी.एस.रस्त्याचे काम करणेच्या स्थळ बदलास कार्योत्तर मान्यता देणेबाबत – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१५/१२/२०१७ व २२/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक – १८**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६३ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०५/०१/२०१८
सुचक – मा. अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

कासारवाडी महिला आयटीआय येथे “ ह ” क्षेत्रीय कार्यालय नव्याने स्थापन झालेले आहे. सदर “ ह ” क्षेत्रीय कार्यालयास मा.पदाधिकारी व अधिकारी तसेच कर्मचारी वर्गासाठी आवश्यकतेनुसार केबीन बनविणे व इतर फर्निचर विषयक कामे निविदा नोटीस क्र.६३/२-२०१६-१७ मधून ( क क्षेत्रीय कार्यालयातील) अंदाजे र.रु.१६,००,०००/- (अक्षरी र.रु.सोळा लाख फक्त) एवढया रकमेचे काम करणेबाबतचा व कामाच्या स्वरुपात व ठिकाणात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – ०२
दिनांक – ०५/०१/२०१८
सुचक – मा. अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे
संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३९ संत तुकारामनगर येथील जिजाऊ सांस्कृतिक भवनात स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.४५/१-२०१६-१७ हे निविदेचे काम करणेत येत आहे. त्यानुसार सदर सांस्कृतिक भवनाच्या आवारात कामे करण्यात आलेली आहेत. परंतु मा.नगरसदस्य यांनी सदर भवनाच्या जागी नविन इमारत बांधणेची मागणी केली आहे. त्यामुळे सदर सांस्कृतिक भवनात स्थापत्य विषयक कामे शक्य नाही. तरी सदर निविदेच्या कामातून नविन प्रभाग क्र.२० येथील मनपा इमारतींची व प्रभागातील अंदाजे र.रु.१५,००,०००/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) एवढया रकमेची इतर स्थापत्य विषयक आवश्यक कामे करणेस आणि सदरील जिजाऊ सांस्कृतिक भवनातील स्थापत्य विषयक कामाच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.स्वाती काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.स्वाती काटे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३ चिखली येथील मोरेवस्ती येथील नव्याने समाविष्ट झालेल्या संतकृपा हौसिंग सोसा. सिंहगड हौसिंग सोसा., एकता हौसिंग सोसा.येथील रस्ते डांबरीकरण करणे (निविदा नोटस क्र.१९/३६-२०१७-१८) निविदा र.रु.२१,००,४७७/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख, चारशे सत्याहत्तर फक्त) ठेकदार मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना आदेश दि.२०/१२/२०१७ रोजी देण्यात आला असून कामाची मुदत ९ महिने म्हणजेच दि.१९/०९/२०१८ अखेरपर्यंत आहे. सदर कामातून सिंहगड हौसिंग सोसा., एकता हौसिंग सोसा.येथील रस्ते डांबरीकरण करणे ऐवजी नविन प्रभाग क्र.१ मध्ये संतकृपा हौसिंग सोसा. व इतर ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण व दुरुस्तीची कामे करणेबाबत मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. तरी प्रभाग क्र.३ चिखली येथील मोरेवस्ती येथील नव्याने समाविष्ट झालेल्या संतकृपा हौसिंग सोसा. सिंहगड हौसिंग सोसा., एकता हौसिंग सोसा.येथील रस्ते डांबरीकरण करणे या कामातून नविन प्रभाग क्र.१ चिखली मध्ये सिंहगड हौसिंग सोसा., व इतर ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण व दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.स्वाती काटे अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.स्वाती काटे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३ चिखली (नविन प्रभाग क्र.१) येथील १/९८ टाऊन हॉल विकसीत करणेच्या कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विशेष योजना या लेखाशिर्षातर्गत करणेत आला असून सदर कामासाठी पान क्र.८० अ.क्र.१०८ अन्वये र.रु.५,०१,०००/- इतकी तरतूद करणेत आली असून मा.स्थायी समिती ठराव क्र.८५१ दि.२३/०८/२०१७ अन्वये र.रु.१,२५,००,०००/- इतकी तरतूद वर्ग करणेत आली आहे व सदर कामास एकूण र.रु.१,३०,०१,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी, तीस लाख, एक हजार फक्त) इतकी तरतूद उपलब्ध आहे. तथापि अनावधानाने टाऊन हॉल आरक्षण क्र.१/९६ ऐवजी १/९८ असे प्रिंट झालेले असून वास्तविक प्रभाग क्र.३ चिखली येथील टाऊन हॉलचे आरक्षण क्र.१/९६ आहे तरी सदर कामाच्या नावात प्रभाग क्र.३ चिखली येथील आरक्षण क्र.१/९६ टाऊन हॉल विकसित करणे असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा. अश्विनी जाधव अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव –

निविदा क्र.४०/२५-२०१६-१७ निविदा र.रु.१४,००,५६०/- (अक्षरी र.रु.चौदा लाख, पाचशे साठ फक्त) अन्वये फुगेवाडील येथे मुंबई-पुणे रस्त्यालगत नाला बांधण्याचे काम आहे. सदरचे काम जागेच्या अडचणीमुळे त्या ठिकाणी होणार नाही. सद्यस्थितीत प्रभाग क्र.३० मध्ये कासारवाडी, फुगेवाडी येथील अनेक तक्रारी, अडचणी लक्षात घेता सदरच्या कामातून फुगेवाडी येथील गटर्स करणे, कॉंक्रीट करणे व

इतर किरकोळ दुरुस्तीची कामे करणे शक्य होईल. तरी फुगेवाडील येथे मुंबई-पुणे रस्त्यालगत नाला बांधणे (निविदा क्र.४०/२५-२०१६-१७) च्या कामातून फुगेवाडी, कासारवाडी येथील गटर्स करणे, काँक्रीट करणे व इतर किरकोळ दुरुस्तीची कामे करणे या कामाच्या स्वरुपात व ठिकाणात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वाती काटे

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

नवी सांगवी वॉर्ड क्र.५८ येथील स्वच्छतागृहाचे नुतनिकरण करणे.

विषय क्रमांक ०६ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव –

वॉर्ड क्र.५७ कवडेनगर येथील नाल्यामधील जलनि:सारण लाईनची सुधारणा विषयक कामे करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३१ मध्ये ठिकठिकाणी करणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७० विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.मीनल यादव यांचा प्रस्ताव –

सांगवी प्रभाग क्र.६० मधील प्रियदर्शनीनगर, एस.टी.कॉलनी मध्ये ड्रेनेज चेंबर आर.सी.सी.करणे हे काम नविन वॉर्ड क्र.३२ मध्ये ठिकठिकाणी करणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०८ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१ विषय क्रमांक – ०९

दिनांक – ०५/०१/२०१८

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.सुरेश भोईर

संदर्भ – मा.अश्विनी जाधव, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव –

वाकड ते हिंजवडी मनपा हद्दीपर्यंत बीआरटीएस रस्ता विकसीत करण्याचे निविदा क्र.३८/३ – २०१५-१६ या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.६६३ दि.०६/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.१५३८६ दि.२६/०२/२०१६ अन्वये खर्चास

मान्यता मिळालेली आहे.  सांगवी-किवळे या बीआरटीएस रस्त्यावरील सांगवी फाटा येथील ग्रेड सेपरेटर या उड्डाणपुलाचे उदघाटन मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचे हस्ते दि.२८/०५/२०१७ रोजी संपन्न झाले आहे.  सदर उदघाटनाच्या अनुषंगाने सांगवी फाटा येथील रस्त्याचे डांबरीकरण निविदा क्र.३८/३-२०१५-१६ या कामाच्या बचतीमधून करण्यात आले असून सदर स्थळ बदलास (Change of Site) कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२१/२०१८
दिनांक : ११/०१/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.